# हवामान अंदाज व शेती व्यवस्थापनात मेघदूत ॲप एक वरदान

पल्लवी चिंचवडे
कृषि पदव्युत्तर पदवी विद्यार्थिनी

डॉ. प्रल्हाद जायभाये
सहाय्यक प्राध्यापक

कृषि हवामानशास्त्र विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. एकूण लोकसंख्येपैकी ४१.४९% लोकसंख्या आर्थिकदृष्ट्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. म्हणजेच जवळपास अर्धी भारतीय लोकसंख्या प्रामुख्याने शेती व्यवसायावर आपली गुजराण करते. शेतीव्यवसाय आणि त्यासोबतचे जोडधंदे पूर्णपणे त्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती आणि तेथील हवामानावर अवलंबून असतात. म्हणजेच मानवजात, पशू-प्राणी, शेती आणि शेतीवर आधारित सर्व उद्योगधंद्यांवर हवामानाचा अनुकूल व प्रतिकूल परिणाम होत असतो. सध्या ग्लोबल वॉर्मिंग म्हणजेच जागतिक तापमान वाढ आणि क्लायमेट चेंज म्हणजेच वातावरण बदल या दोन मुद्द्यांनी संपूर्ण विश्वाला घेरले आहे. तसेच आपण पाहतो की नैसर्गिक आपत्ती (दुष्काळ, पूर, चक्रीवादळ, अतिवृष्टी, गारपीट) शेतमालाला हानिकारक ठरते आणि त्यामुळेच शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होऊन आत्महत्याची वेळ येते.

या सर्व गोष्टींवर मात करायची असेल तर हवामान, हवामानाचा शेती व उद्योगधंदे यांच्यावर होणारा परिणाम, हवामानाचा अंदाज या सर्व विषयांचा अभ्यास करूनच शेती केली पाहिजे आणि त्यामुळेच शेतकरीराजा तारला जाऊ शकतो. हा सर्व अभ्यास करण्यासाठी शेतकऱ्यांपर्यंत कृषी हवामान अंदाज पोहोचवणे आणि त्याचा वापर कसा करावा हे सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठीच आपण येथे कृषि हवामान अंदाज पाहिजे त्यावेळी आणि पाहिजे त्या ठिकाणी उपलब्ध करून देणाऱ्या एका मोबाईल ॲप्लिकेशनची ओळख करून घेणार आहोत. हे ॲप्लिकेशन कुठून घ्यायचे आणि ते कसे वापरायचे हे शिकणार आहोत. आजकाल जवळपास सर्वच शेतकऱ्यांच्या खिशात अँड्रॉइड मोबाईल पाहायला मिळतात. त्यामुळे हे ॲप वापरणे अतिशय सोयीस्कर आणि किफायतशीर होणार आहे.

या मोबाईल ॲपचे नाव मेघदूत आहे. हवामानावर आधारित शेती व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठीचे हे एक मोबाईल ॲप आहे. आयएमडी (इंडिया मेट्रोलॉजिकल डिपार्टमेंट) भारतीय हवामानशास्त्र विभाग, आईसीएआर (इंडियन कौन्सिल ऑफ ऍग्रिकल्चरल रिसर्च) भारतीय कृषी संशोधन परिषद आणि आयआयटीएम (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी) भारतीय उष्णकटिबंधीय हवामान शास्त्र यांच्या संयुक्त विद्यमाने बनवलेले हे मोबाईल ॲप्लिकेशन आहे. या ॲपचे मुख्य उद्दिष्ट हवामानावर आधारित शेती व्यवस्थापनासाठी माहिती शेतकऱ्यांना सोप्या पद्धतीने पोचविणे हे आहे.




## कृषी हवामान अंदाजाचे प्रामुख्याने किती व कोणते प्रकार पडतात ?

### सद्यस्थितीतील अंदाज:

या पद्धतीमध्ये हवामान अंदाजाची उपयुक्तता ३ तासांपर्यंत असते.

### लघुकालावधी अंदाज:

या पद्धतीत हवामान अंदाजाची उपयुक्तता ३ तास ते ३ दिवसांसाठी असते.

### मध्यकालीन अंदाज:

या पद्धतीमध्ये हवामान अंदाज ३ ते १० दिवसांसाठी दिला जातो.


### दीर्घकालीन अंदाज:

या पद्धतीत १० दिवसांपेक्षा अधिक- साधारणपणे एक महिना किंवा संपूर्ण एका हंगामासाठी हवामान अंदाज वर्तविला जातो.

## मेघदूत ॲप कसे डाऊनलोड करावे?

मेघदूत ॲप आपण गूगल प्ले स्टोर वरून मेघदूत हे नाव टाकून डाउनलोड करू शकतो. फिक्या व गडद निळ्या रंगात भारतीय राजमुद्रेत हे ॲप्लिकेशन दिसते. ॲप डाउनलोड केल्यानंतर मोबाईल नंबर टाकून त्यात आपल्या पसंतीची भाषा निवडावी लागते. त्यानंतर उजव्या बाजूला असलेल्या साइन अप वर क्लिक करून

आपली प्राथमिक माहिती या ॲपवर नोंदवावी लागते. खाली दिलेल्या काही फोटोग्राफ्स मधून आपल्याला ॲप डाऊनलोड करण्यापासून तर मोबाईलमध्ये उघडण्यापर्यंत सर्व गोष्टींची कल्पना येईल.







## मेघदूत ॲपची वैशिष्ट्ये काय आहेत?


- मेघदूत ॲंपद्वारे मागील पाच दिवसांची हवामान नोंदणी घेता येते व पुढिल पाच दिवसांचा हवामान अंदाज मिळतो.
- हवामान अंदाजामध्ये हवामानाचे घटक जसे पाऊस, किती पडला आणि किती पाऊस पडणार आहे, वाऱ्यांचा वेग आणि दिशा कोणती असणार आहे, दिवसभरातील कमाल व किमान आर्द्रता किती असेल, दिवसाचे कमाल व किमान तापमान किती असेल, या सर्वांची माहिती आपल्याला या ॲपद्वारे मिळते.
- तसेच आभाळ ढगाळ आहे की स्वच्छ आणि त्यावरून पावसाचा अंदाज किती मिलिमीटर पर्यंत आहे ही माहिती देखील आपल्याला मेघदुत ॲपद्वारे निवडलेल्या स्थानासाठी मिळते.
- हवामान अंदाजचा इशारा या ॲपद्वारे शेतकऱ्यांना मिळतो. जसे की एखाद्या विशिष्ट दिवशी वादळ, विज, स्क्वॉल्स असेल तर ते गडद पिवळ्या रंगात आणि गारपीट असेल तर ते गडद नारंगी रंगात दर्शविले जाते. तसेच साधारण हवामान परिस्थिती असल्यास चेतावनी नाही असा संदेश गडद हिरव्या रंगात शेतकऱ्यांना मिळतो.
- हवामान अंदाजाव्यतिरिक्त या ॲपमध्ये डाव्या कोपऱ्यात असलेल्या तीन रेशांवर क्लिक केल्यानंतर त्यात सर्व पिकांची माहिती लागवडीपासून ते काढणीपर्यंत वेळापत्रकाप्रमाणे दिलेली असते.
- यात माझे आवडते या विभागात आपल्याला पाहिजे असलेल्या पिकांची निवड करून फक्त त्याबद्दल माहिती आपण पाहू शकतो.
- पशूपालन व पीक व्यवस्थापन याबद्दल माहिती देखील शेतकऱ्यांना मिळते.
- या ॲपवरील सर्व माहिती ही प्रत्येक मंगळवार आणि शुक्रवारी अद्ययावत केली जाते.
- या ॲपवर असलेल्या पिकांच्या वेळापत्रकानुसार पिकांची पेरणी किंवा लागवड कधी करावी त्यांना खतांचा मात्रा किती असावा आणि कोणत्या वेळी द्यावा या सर्वांची माहिती आपण निवडलेल्या विभागातील पिकाबद्दल दिलेली असते.
- यात विशेष म्हणजे कोणत्याही राज्यातील कोणत्याही जिल्ह्यासाठी आपण त्या जिल्ह्यातील विशिष्ट पिकाची माहिती घेऊ शकतो आणि त्या पिकाला कुठल्या प्रकारचे हवामान अनुकूल आहे याची नोंद घेऊन ते पीक आपल्या विभागात लागवड करता येऊ शकते का याचा विचार करू शकतो.










येथे आपण मेघदूत ॲपबद्दल ओळख करून घेतली तर येणाऱ्या खरीप हंगामात नक्कीच आपल्याला या ॲपचा फायदा होऊ शकतो आणि हे ॲप सर्व शेतकऱ्यांना एक वरदानच ठरेल अशी मी आशा बाळगते.

(संपर्क: +९१ ९१३०५०३०४५)

★ ★ ★